| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **प्रेसनोट**<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,<br>पुणे-४११००६ | पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |

जा.क्र./पोउआ/वाह/ ६०७७/२०२३ पुणे दिनांक २५ /०८/२०२३

पुणे शहरातील येरवडा वाहूतक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, येरवडा वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यांवर अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका,इ.) खेरीज करून खालीलप्रमाणे जड वाहतूकी संदर्भात अंतिम आदेश निर्गमित करीत आहे.

**येरवडा वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

- **शास्त्रीनगर चौकातील सह्याद्री हॉस्पीटल लेन येथुन बदामी चौक, जुना एअर पोर्ट रोड येथे जाणारी व एअरपोर्ट रोडवरील बदामी चौक येथून सह्याद्री हॉस्पीटल लेन मार्गे नगर रोडकडे जाणाऱ्या जड वाहनांचे वाहतूकीस बंदी करण्यात येत आहे.**

पर्यायी रस्ता –

**१)शास्त्रीनगर चौक सरळ गोल्फ चौक, उजवीकडे वळुन एअरपोर्ट रोडने बदामी चौक पुढे इच्छितस्थळी**

**२) बदामी चौक सरळ गोल्फ क्लब चौक डावीकडे वळण घेवुन शास्त्री नगर चौक पुढे इच्छितस्थळी**

(विजयकुमार मगर)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर